अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ११ फेब्रुवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : १३३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## इंग्लंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांसाठी टीम इंडियाची घोषणा

**मुंबई** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं इंग्लंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटच्या ३ सामन्यांसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा केली आहे.

इंग्लंडविरुद्ध टीम इंडिया पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. आतापर्यंत त्यापैकी दोन सामने खेळवण्यात आले आहेत. त्यातील एक सामना इंग्लंडनं, तर एक सामना टीम इंडियानं जिंकला आहे. इंग्लंड विरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. टीम सिलेक्शनमधील



सर्वात मोठी अपडेट म्हणजे, पहिल्या दोन सामन्यांप्रमाणेच उर्वरित तीन सामन्यांमध्येही विराट कोहली खेळताना दिसणार नाही. वैयक्तिक कारणांमुळे विराट कोहली उर्वरित सामन्यांसाठी निवडीसाठी उपलब्ध नसल्याची माहिती बीसीसीआयकडून देण्यात आली आहे. आता पुढच्या तीन सामन्यांच्या निकालावर कसोटी मालिकेच्या विजयी संघाची घोषणा होणार आहे.

अशातच गेल्या दोन सामन्यांत दिग्गज खेळाडूंशिवाय मैदानात उतरलेल्या टीम इंडियाला उर्वरित तीन सामन्यांत काहीसा दिलासा मिळणार आहे. टीम इंडियाचा स्टार ऑलराउंडर रवींद्र जाडेजा आणि स्टार फलंदाज केएल राहुलचं पुनरागमन झालं आहे. पण टीम इंडियाची रनमशीन असलेला दिग्गज विराट कोहली यानं मात्र, इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांमधूनही ब्रेक घेतला आहे.

# चिमुरडी नात म्हणतेय,
# आजीऽऽ पप्पाचा फोन का येईना ना गं!
## कुठे गेलेत गं पप्पा? कधी येणार आहेत, ते तरी सांग ना...?

**सुराज्य/शिवाजी भोसले**

लेक अन् सून दोघेही पोलीस खात्यात कामामुळे सुनेला लेकराकडे बघणे होत नाही म्हणून मोठ्या हौसेने आजीने आपल्या चिमुरड्या अडीच वर्षाच्या नातीला आपल्याकडे गावी ठेवून घेतलेले. आजीने लावलेल्या जिवापाड प्रेमामुळे नातीला आईपेक्षाही जास्त लळा लागलेला. आजी अन् नात यांचे एकमेकींवर एवढे जिवापाड प्रेम की दोघांनाही एकमेकीशिवाय राहणे अशक्यच. आपल्या पोटच्या गोळ्याला जन्मदाते आई-बाप दर आठवड्याच्या सुटीला भेटायला येणारे. हे अगदी कसे छान चाललेले.पण गुरुवारचा दिवस उजडला तो आजी आणि नातेसाठीच भयानक. वाजणारा फोन आजीने कानाशी लावला. पुढच्या क्षणी आजी जमिनीवर कोसळली. तिच्या सोबत असलेल्या अडीच वर्षाच्या नातीला काहीच कळालेले नव्हते. मात्र, खूप काही भयानक झाले होते. नियतीने खूप काही वाढून ठेवलेले होते. सगळेच काही उद्ध्वस्त झाले होते. एखाद्या चित्रपटाला शोभेल अशी स्टोरी...दैनिक 'सुराज्य'च्या खास वाचकांसाठी..!



आकाश अभिमान तोगे (मूळ राहणार : घोळवेवाडी, ता.बार्शी, जि. सोलापूर हल्ली राहणार : बागवान नगर करमाळा) हे पोलीस हवालदार म्हणून करमाळा पोलीस ठाण्यात समन्स वाटप टेबलला कार्यरत होते. त्यांची पत्नी धनश्री मांढरे (मांढरे हे माहेरचे आडनाव) यासुद्धा याच पोलीस ठाण्यात हवालदार म्हणून

### आजीला प्रश्न पडलाय् पप्पा कायमचे सोडून गेल्याचं तिला सांगावे कसं ?

कार्यरत आहेत. या दोघांचा आंतरजातीय विवाह झालेला. त्यांच्या संसारवेलीवर कळी उमललेली. त्यांना अडीच वर्षाची मुलगी. दोघेही नोकरीला आहेत. नोकरीच्या व्यापात चिमुरडीकडे लक्ष देणे होत नाही, म्हणून दोघांच्या विचाराने चिमुरडीला तिच्या वडिलांच्या आईकडे म्हणजे घोळवेवाडीला आजीकडे ठेवलेले.करमाळा पोलीस ठाण्यात दोघांचीही नोकरी सुरळीत चाललेली. तथापि, अशातच बुधवारी (ता. ७) साधारण रात्री पावणेआठ वाजेपर्यंत आकाश आणि धनश्री दोघेही पोलीस ठाण्यात होते.

दरम्यान, आकाश तोगे घरी गेले. त्यांनी एक चिठ्ठी लिहिली. ज्यामध्ये सर्व काही हकिगत मांडली अन् रात्री अकराच्या दरम्यान छताच्या पंख्याला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविली. व्हॉटस्‌अ‍ॅपवरील चिठ्ठी वाचून सूरज नामक नातेवाईकाने सुरुवातीस आकाश यांना फोन लावला. त्यांच्याकडून प्रतिसाद येत नाही हे लक्षात आल्यानंतर पोलीस ठाण्यात असलेल्या पत्नी धनश्री यांना फोन लावून चिठ्ठीबद्दल कल्पना दिली. पत्नी धनश्री यांनी घरी येऊन पाहिले असता आकाश यांनी गळफास घेऊन स्वत:ला संप विले होते. आकाश यांना फासावर लटकलेले पाहताच पत्नी धनश्री यांच्या पाया खालची वाळूच सरकली. आपण काय बघतोय, हे त्यांना क्षणभर समजले नाही. पोलीस हवालदार असलेल्या धनश्री हिचे पोलीस हवालदार गणेश शिंदे यांच्याशी प्रेम प्रकरण होते. या दोघांमधील गुटरगुंम आकाश यांना मान्य नव्हते. आकाश यांनी पत्नी धनश्रीला




### जन्मदात्री आईच ठरली लेकीला बापापासून पोरके करण्याला कारणीभूत

**बिचाऱ्या आईवर दु:खाचा डोंगर तरी किती कोसळावा**

नियती किती क्रुर असू शकते. याचा प्रत्यय तोगे परिवाराकडे पाहिल्यानंतर येतो. मृत आकाश यांचे वडील अकाली गेलेले. त्यामुळे आपसूकच त्यांच्या आईला वैधव्य आलेले. आयुष्याचा जोडीदार गेल्याने संसाराचा अक्षरश: उन्हाळा झालेला. तरीही त्यांनी मुलाच्या तोंडाकडे पाहून आपले आयुष्य मुलाच्या भल्यासाठी वेचलेले. मोठ्या कष्टाने मुलगा आकाश याला पोलिसाची नोकरी लावलेली. मुलगा, सून, नातवंडे यांचे सुख पाहता पाहता कायमचे डोळे झाकू असा विचार करणाऱ्या आईला स्वप्नातही कधी वाटले नाही. हाताशी आलेला मुलगा आपणास कायमचा सोडून जाईल. सुरवातीला नवरा आणि नंतर मुलगा दोघेही कायमचे सोडून निघून गेले. बिचाऱ्या आईवर दु:खाचा डोंगर तरी किती कोसळावा.

**चिमुरडीला पप्पा दाखवायचे कोठून?**

पत्नीच्या प्रेम करणातून आकाश यांनी स्वत:ला संपविले. आत्महत्या प्रकरणातून धनश्री ही आता संशयित म्हणून जेलमध्ये आहे. दरम्यान, आठवड्याला मम्मी आणि पप्पा भेटायला यायचे, ते आता येणार नाहीत. चिमुरड्या नातीला हे सांगायचे तरी कसे? हा मोठा प्रश्न आजीपुढे आहे. जिला अजून जगाची नीट ओळखदेखील झालेली नाही. त्या चिमुडीवर पप्पा कायमचे सोडून गेल्याचा आणि मम्मी जेलमधे अडकल्याचा प्रसंग गुदरला आहे.

बऱ्याच वेळा सांगितलेदेखील होते. तरीही धनश्री प्रेमसंबंध तोडायला तयार नव्हती. पत्नी धनश्री आणि प्रियकर मित्र गणेश शिंदे यांनी आकाशला मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटलेदेखील होते. अगदी सरळमार्गी असलेल्या शांत आणि संयमी आकाशला पत्नी धनश्री ही उधळत असलेले प्रेमाचे रंग मान्य नव्हते. शेवटी

### प्रेमाचे गुटर्गू झाले खरे पण संसाराची झाली राखरांगोळी



विवाहबाह्य संबंध अलिकडच्या काही वर्षात वाढले आहेत. वास्तविक विवाह बाह्य संबंध हे गैरच आहेत. समाजाकडून त्याला मान्यता नाहीच. अशा संबंधामधून अनेक कुटुंबे उध्दवस्त होत आहेत. प्रेम प्रकरणात अडसर ठरणाऱ्यांचा कायमचा काटा काढण्याच्या भयावह घटना घडत आहेत. त्याचबरोबर पत्नीचे बाहेरख्याली संबंध सहन होत नसल्याने अनेकजण स्वत:चा कायमचे संपवत आहेत. दोन्ही कुटूंबांसाठी जे घडतय् ते योग्य नाही. समाजाचे यातून नुकसान होत आहे. वैवाहिक संबंध टिकण्यावर विवाहबाह्य संबंधांमुळे मोठे प्रश्नचिन्ह आले आहे. समुदेशनाची गरज आहे. पण, पत्नीच्या संबंधामुळे स्वत:ला कायमचे संपविणे हा काही कायमचा पर्याय होऊ शकत नाही.

**- डॉ. निहार बुरटे,**
मानसोपचार तज्ज्ञ, सोलापूर

आकाश यांनी आत्महत्या करून स्वत:ची जीवनयात्रा संपविली. आकाश कायमचा गेला. त्याच्या आत्महत्या प्रकरणात संशयित म्हणून जेलमध्ये गेलेली पत्नी केव्हा ना केव्हा तरी बाहेर येईल. पण आकाशच्या आईचे आणि चिमुरड्या मुलीचे काय? या दोघींही आकाशपासून कायमच्या पोरक्या झाल्या.



## ९० हजारांच्या दोन गायी चोरल्या

**सुराज्य/सोलापूर**

मोहोळ तालुक्यातील कामती बु येतील तुळशीदास दत्तात्रेय गायकवाड (वय २४), यांनी कामती पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार दि. ३ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकरा वाजल्यापासून ते दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान कामती बुद्रुक शिवारातील युवराज टेळे यांच्या मालकीच्या शेतातून अज्ञात चोरट्याने ९० हजार रुपये किंमतीच्या दोन गायी चोरुन नेल्या आहेत.

यासंदर्भात अज्ञात चोरट्यावर कामती पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कोटमळे हे करीत असल्याची माहिती शनिवारी पत्रकारांना देण्यात आली आहे.

## आगीत तीन शेळ्यांचा होरपळून मृत्यू

**सोलापूर** : नई जिंदगी परिसरात असलेल्या हद्दवाढ भागातील नागनाथ नगरात शनिवारी भीषण आग लागली होती. होटगी रोड विमानतळामागे असलेल्या नागनाथ नगरात आगीचे तांडव पाहायला मिळाले. या भीषण आगीत गोडाऊन मध्ये बांधलेल्या तीन शेळ्यांचा जळून मृत्यू झाला.तसेच एक दुकान व चार घरांना शनिवारी सकाळी सात ते साडेसातच्या सुमारास अचानक आग लागली.

या आगीची माहिती मिळताच सोलापूर अग्नीशामक दलाची यंत्रणाही तत्काळ धाऊन आली.अग्निशामक दलाचे अधीक्षक केदार आवटे यांच्या अधिपत्याखाली पाण्याचे बंब वापरून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले आहे.या



आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून, एका गोडाऊन मध्ये बांधलेल्या तीन शेळयाचा मृत्यू झाला आहे. आग विजविण्यात आली असून, घटनास्थळी अग्नीशामक दलाचे जवान पंचनामा करत आहे.हे नगर हे होटगी रोड विमानतळामागे बेकायदेशीरपणे निर्माण करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारचे ले आऊट किंवा महापालिका प्रशासनाची मंजूरी न घेता नागनाथ नगर वसाहत निर्माण करण्यात आली आहे.आतील बाजूस असलेले रस्ते देखील योग्य नाहीत.

## एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या रेल्वेत चोरी; ३ लाख ८१ हजारांचा ऐवज लंपास

**सुराज्य/कुर्डूवाडी**

एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या रेल्वेमध्ये प्रवाशांची चोरी झाली असून या दोन्ही चोऱ्यांमध्ये ३ लाख ८१ हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे.

या घटना दि.६ रोजी सोलापुर व कुर्डुवाडी स्थानकादरम्यान घडल्या. याबाबत पहिल्या घटनेतील फिर्यादी महिला शामला हवालदार रा.बेंगलोर या दि. ५ रोजी गाडी नं १६२१७ साईनगर - शिर्डी या गाडीतून कोच नं एस १ सीट नं ७५,७७ वरुन बेंगलोर ते साईनगर - शिर्डी असा झोपून प्रवास करत असताना दि.६ रोजी सदर गाडी सदर गाडी पहाटे ४.३५ ते ४.४० वा.दरम्यान कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर थांबली. फिर्यादीला झोपेतून जाग आली असता गोल्डन रंगाची पर्स ज्यामध्ये ५० ग्रॅम वजनाचे २ लाख ५० हजार किंमतीचे मंगळसूत्र, ४० हजारांचा आय फोन, १५ हजारांचा ओपो कंपनीचा मोबाइल व ६ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख ११ हजारांचा ऐवज असलेली पर्स दिसून आली नाही.



त्यावेळी इतरत्र शोध घेत असताना काळा टीशर्ट व डोक्यावर टोपी असलेला ३० वर्षीय एक इसम पळून जाताना फिर्यादीला दिसला.

सदर पर्स या संशयीत इसमाने चोरून नेली असल्याचा फिर्यादीचा संशय असून सदर अज्ञात इसमावर फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. दुसऱ्या घटनेत फिर्यादी अंजुनेड्डु सय्यदलु अक्केम हे दि. ५ रोजी पुणे येथे जाण्यासाठी गाडी क्र. २२७३१ हुसेनसागर एक्सप्रेसने हैद्राबाद ते पुणे असा जनरल बोगीतून प्रवास करत असताना दि.६ रोजी सदर गाडी ५ वा. सुमारास सोलापूर येथे आली असता त्यावेळी फिर्यादीची लॅपटॉप बॅग त्याच्याजवळ होती. प्रवासा दरम्यान झोप लागली असताना सकाळी ६ वा. गाडी केम रेल्वे स्थानकावर थांबली असता फिर्यादी जागा झाला. त्यावेळी ७० हजार ५०० रुपयांचा लॅपटॉप व बॅग त्याच्याजवळ नव्हती. सदर लॅपटॉप ची बॅग अज्ञात चोरट्याने केम रेल्वेस्थानकावर येण्यापूर्वी चोरून नेली.

## स्पीड ब्रेकरवरून घसरलेल्या दुचाकीस्वाराचा रुणालयात मृत्यू

**सोलापूर** : स्पीडब्रेकर वरून घसरून जखमी झालेला नितेश कृष्णा यलमार (वय २८ रा.सुपली ता.पंढरपूर) हा सोलापूरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी सकाळी मरण पावला..

तो रोजी रात्रीच्या सुमारास पंढरपूर येथून सुपली गावाकडे भावाच्या दुचाकीमागे बसून निघाला होता. उपरी गावात दुचाकी (क्र एमएच १३ इ ई १११५) घसरून तो जखमी झाला होता. पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून त्याला सोलापुरात बेशुद्ध अवस्थेत दाखल करण्यात आले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तेजस्वी यादवांच्या बंगल्यावर राजदचे ७६ आमदार बंदिस्त

**बिहार** : बिहारमध्ये पलटुराम नितीश कुमार यांच्या भाजपसोबतच्या सरकारला बहुमत चाचणीला सामोरे जावे लागणार आहे. अशातच जदयूचे आमदारा संपर्कात असलेल्या लालू प्रसाद यादवांना आज जोरदार धक्का बसला आहे. बाहुबली आनंद मोहन याच्या मुलासह त्यांची पत्नी व एक डझन आमदार संपर्काबाहेर गेले होते. यामुळे तेजस्वी यादव यांनी सर्व आमदारांना आपल्या निवासस्थानी जमण्यास सांगितले आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तो मी नव्हेच, आता मी पक्ष बदललंय !

कल्याण
379-98-170

# आरोग्यमंत्री प्रा. सावंतांचे प्रणिती शिंदेंवर टिकास्त्र म्हणाले; त्यांना सोलापूरची रियालिटी माहिती नाही!

**सुराज्य/खास प्रतिनिधी**

**वादग्रस्त वक्तव्याने महाराष्ट्रभर चर्चेचे वादळ निर्माण करणारे राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी आज शनिवारी (ता. १०) काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात वक्तव्य करून सोलापुरातील नव्या सरकारी हॉस्पिटलप्रकरणी प्रणिती शिंदे या कशा अनभिज्ञ आहेत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला.**

त्याचे झाले असे की, गुरुनानक चौक परिसरात उभारण्यात आलेल्या शासकीय रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा आरोग्यमंत्री प्रा. सावंत यांना लोकसभा निवडणुकीपूर्वी पार पाडून त्यासंबंधींचा सकारात्मक मेसेज जनतेमध्ये या राज्यातील विद्यमान सरकारबद्दल पाठवायचा आहे. या पार्श्वभूमीवर, या रुग्णालयाची पाहणी करण्यासाठी श्री. सावंत हे आज सोलापुरात आले होते. रुग्णालयाची पाहणी करुन झाल्यानंतर त्यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी हाटकले तेव्हा त्यांच्या नेहमीच्या स्टाईलने सुसाट एक्स्प्रेस प्रसारमाध्यमांपुढे सुटली. यावेळी त्यांनी शासकीय रुग्णालयासंबंधी माहिती दिला. माध्यमांच्या प्रतिनिधींनी आमदार प्रणिती शिंदे यांनी या रुग्णालयासंबंधी यापूर्वी केलेल्या वक्तव्याचा मुद्दा छेडताच नामदार सावंत नाही म्हटले तरी भडकलेच. त्यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्यावर टीकेची तशी छोड उठविली. ते म्हणाले, ''प्रणिती शिंदे यांना शिवाजी सर्वोपचार रुग्णालय आणि नव्याने उभारण्यात आलेले दुसरे शासकीय महिला आणि बालकल्याण रुग्णालय याबद्दल माहिती नाही. त्यांचे जमलिंग झाले असावे. सिव्हिल हॉस्पिटल हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास आम्ही देऊन टाकले आहे. म्हणून आम्ही नवे रुग्णालय बांधले आहे. सभागृहात विचारलेला प्रश्न हा शिवसेनेच्या नेत्याला एखादा प्रश्न विचारायचा असेल म्हणून थोडे राजकीय म्हणून त्यांनी विचारला असावा. त्यांनी रियालिटी इथली माहिती नाही''.





**२९ फेब्रुवारी दरम्यान उद्घाटनाच्या फटाकड्या**

सोलापुरात नव्याने उभारण्यात आलेल्या महिला आणि बालकल्याण रुग्णालयाच्या फिनिसिंगचे काम राहिले आहे. बांधकाम विभाग आणि ठेकेदार यांच्यामधील समन्वयातून २९ फेब्रुवारपूर्वी या रुग्णालयाचे संपूर्ण काम पूर्ण होईल असे अपेक्षित आहे. २९ फेब्रुवारीदरम्यान आपण या रुग्णालयाचे उद्घाटन करण्यासाठी प्रयत्नशील आहोत असेही नामदार प्रा. सावंत यांनी सांगितले.